MHNG100015892024

दाखल दिनांक : १४.१०.२०२४
नोंदणी दिनांक : १४.१०.२०२४
निकाल दिनांक: १२.०३.२०२६
कालावधी : ० १व ०४म.२९दि.

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, उमरेड , यांचे न्यायालय**
**(पीठासीन अधिकारी रा.भा. डोळे)**

**सं.फौ.खटला क्र. ८०५/२०२४** **निशाणी क्र. ०१ खाली**

**अभियोग पक्ष** : महाराष्ट्र शासनातर्फे
पोलीस अधिकारी , पोलीस स्टेशन, उमरेड.
ता. उमरेड, जि. नागपूर

**.. विरुध्द ..**

**आरोपी** : **सतीश भास्कर काटोले.**
वय – २९ वर्षे, धंदा – मजुरी,
रा. गांगापुर, तह. उमरेड.
जि. नागपूर.

---

सरकारतर्फे : श्री. संदिप काठोके , सहा. सरकारी अभियोक्ता.
आरोपीतर्फे : श्री. आर.बी. रणदिवे.

---

**आरोपपत्रः– महाराष्ट्र दारुबंदी कलम ६५ (ई) नुसार**

**न्या य नि र्ण य**
**(पारीत दिनांक १२.०३.२०२६)**

प्रस्तूतचा खटला हा आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) नुसार दंडनीय असलेला अपराध केल्याच्या आरोपावरून दाखल करण्यात आला.

२. आरोपी विरुध्द दिनांक १६.०९.२०२५ रोजी महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) नुसार निशाणी क्र. ११ अन्वये आरोपाचा आशय नोंदवून घेतला. त्या आरोपाचा आरोपीने स्पष्टपणे इन्कार केला.

३. अभियोग पक्षाची बाजु व आरोपीचा बचाव लक्षात घेता, मी खालीलप्रमाणे मुद्दे विचारार्थ घेऊन त्यावरील निष्कर्ष कारणेमिमांसेसह नोंदवित आहे.

| अ.क्र. | **मुद्दा** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दिनांक १७.०९.२०२४ रोजी १५.१० ते १६.०५ वाजेच्या सुमारास, गांगापुर तह. उमरेड. जि. नागपूर, येथे आरोपी त्याच्या ताब्यात १२ सीलबंद निपा. देशी दारु अवैधरित्या विनापास परवाना विक्री करतांना मिळून आला आणि त्याद्वारे आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) नुसार दंडनीय असलेला अपराध केला असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | **...नाही** |
| २. | काय आदेश ? | **अंतिम आदेशा प्रमाणे** |

४. मार्च, २०२० पासून कोरोना विषाणूचा प्रार्दुभाव टाळण्यासाठी टाळेबंदी लागू केली होती. त्याचा परिणाम जन–जीवनासोबतच न्यायालयीन कामकाजावर देखील झाला. मा. उच्च न्यायालयाने न्यायालयीन कामकाजासाठी वेळोवेळी परिपत्रक निर्गमित केले. मा. उच्च न्यायालयाच्या परिपत्रकान्वये दिनांक ०२.०८.२०२१ पासून न्यायालयीन कामकाज हे पूर्ववत सुरू झाले.

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्र. १ साठी</u>**

५. अभियोग पक्षाच्या वतीने एकूण दोन साक्षीदार तपासण्यात आले आहे साक्षीदार क्र. १ राजु माधवराव काटवले व सा.क्र. २ पवन दिलीप धुळे यांना तपासण्यात आले. आरोपी पक्षाने त्यांचा बचावाचा पुरावा दिला नाही.

६. प्रस्तूत खटल्यात आलेल्या पुराव्याचे अवलोकन केले.

७. साक्षीदार क्र. १ व २ हे घटनास्थळ पंच आहेत. त्यांनी फक्त त्यांच्या पंचनाम्यावरील सही ओळखली. सदर साक्षीदारांनी अभियोग पक्षास सहाय्य केले नाही. म्हणून त्यांना फितूर घोषित करण्यात आले, परंतु फितूर म्हणून घोषित करुन सुध्दा त्याने अभियोग पक्षास दाद दिली नाही.

८. रासायनिक परिक्षणाचा अहवाल देखील अभिलेखावर दाखल आहे. पंच साक्षीदार हे अभियोग पक्षास फितुर झाले. खटला हा संक्षिप्त स्वरुपाचा आहे. आरोपी यांच्या विरुध्द परीस्थीती विशेषंकाचा पुरावा नसल्याने फौ.प्र.सं.चे कलम ३१३ चे निवेदन नोंदविणे योग्य नाही. त्यामुळे आरोपीस सुट देण्यात येते. खटला हा साधारणपणे दोन वर्ष जुना आहे. संक्षिप्त स्वरुपाचा खटला असल्याने न्यायालय फौ.प्र.सं. चे कलम २५८ अन्वये आदेश पारीत करु शकते. यामध्ये दोन पंच साक्षीदार तपासले असल्याने मी प्रस्तुतच्या खटल्यामध्ये न्यायनिर्णय पारीत करत आहे, कारण तेच न्यायोचित आहे व कायद्याचे मानद देखील आहे.

९. त्यामुळे जप्त करण्यात आलेला मुद्देमाल हा घटनास्थळावरुन आरोपीच्या ताब्यातूनच जप्त करण्यात आला, हे पुराव्या अभावी सिध्द होऊ शकले नाही. सबब,

पुराव्या अभावी आरोपीवरचा गुन्हा सिध्द होत नसल्याने मी न्यायाच्या दृष्टीने मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवितो व मुद्दा क्र.२ करिता पुढीलप्रमाणे अंतिम आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५८ च्या तरतुदीनुसार आरोपीला महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) च्या आरोपातून निर्दोष मुक्त केले. खटला हा बंद करण्यात येतो.

२. आरोपीच्या वतीने दाखल करण्यात आलेले बंधपत्र व जामीन कदबा हा रद्द करण्यात येतो.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम ४३७–अ नुसार रु.१५,०००/– (अक्षरी रुपये पंधरा हजार मात्र) चे नविन बंधपत्र व जातमुचलका द्यावा.

४. जप्त मुद्देमाल हा योग्य त्या कार्यवाहीसाठी राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, नागपूर यांच्याकडे पाठविण्यात यावा.

५. न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधिघोषित केला.

स्वाक्षरी/–

**उमरेड** **(रा.भा. डोळे)**
**दिनांक : १२.०३.२०२६** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,उमरेड**

**–: प्रमाणपत्र :–**

मी प्रमाणित करतो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णय / आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांव :– आर.ए.देशकर

न्यायालयाचे नांव :– न्यायदंडाधिकारी, प्र. वर्ग, उमरेड

पीडीएफ फाईल अपलोड केल्याचा दिनांक :– ०८.०९.२०२५

स्वाक्षरीत/–
लघुलेखक (श्रेणी–३)